[illegible]

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
शासन निर्णय क्र. एजसीए १५१०/प्र.क्र.२३९४/ कामगार-५
दिनांक :- १७ ऑक्टोबर, २०१३

पहा :- १) शासन आदेश क्र. एजसीए १५२००५/प्र.क्र.(२३२/६)/ कामगार-५, दि. १९/६/२००६
२) शासन आदेश क्र. एजसीए १५२००५/प्र.क्र.(२३२/६)/ कामगार-५, दि. १९/६/२००६
३) शासन आदेश क्र.एसजीए १५२००९/प्र.क्र.१५८८/कामगार-५, दि. २/३/२००९
४) शासन निर्णय क्र. एसजीए १५१०/प्र.क्र.२३९४/ कामगार-५, दि. २५ ऑगस्ट २०१०

प्रस्तावना :- महाराष्ट्रात कारखाने, कंपन्या , व्यापारी आस्थापना इत्यादी ठिकाणी खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीज मार्फत नोकरी करीत असलेल्या सुरक्षा रक्षकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे तसेच सुरक्षा रक्षकांच्या नोकरीचे नियमन करणे व त्यांच्या नोकरीच्या अटी व शर्ती व त्यांचे कल्याण यासाठी आणि त्यांच्याशी संबंधीत बाबी यासाठी अधिक चांगल्या तरतूदी करणे, अशा सुरक्षा रक्षकांचा पुरवठा योग्य प्रकारे व्हावा या उद्देशाने शासनामार्फत महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण ) अधिनियम, १९८१ च्या कलम ३ मध्ये व त्याखालील योजना, २००२ (सुधारीत) या अंतर्गत तरतूद करण्यात आली आहे. सन १९८१ पासून हा अधिनियम अंमलात आला असून त्यासाठी सदर योजनेची अंमलबजावणी आणि सनियंत्रण करण्यासाठी बृहन्मुंबई व ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, धुळे, सांगली, अहमदनगर, अमरावती, चंद्रपूर व कोल्हापूर इत्यादी ठिकाणी सुरक्षा रक्षक मंडळांची निर्मिती करण्यात आली आहे. सुरक्षा रक्षक मंडळांच्या कामाची तसेच अधिनियमांतर्गत तरतूदींची प्रभावी अंमलबजावणी करतांना सुरक्षा रक्षकांची नोंदणीकरणाच्या प्रक्रीयेत काही अडचणी आढळून आल्याने सदरहू प्रक्रिया अधिक सूलभ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यादृष्टीने शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे :-

**शासन निर्णय :-**

या विभागाच्या दि. २५ ऑगस्ट, २०१० च्या शासन निर्णयान्वये मंडळात नोंदणी होण्यासाठी संबंधीत सुरक्षा रक्षकांनी १८० दिवस काम केल्याचा पुरावा मालकाकडून घेण्याची तरतूद करण्यात आली होती. हा १८० दिवसांचा कालावधी खूपच मोठा असल्याने तसेच असा कोणताही पुरावा मालक ठेवत नसल्यामुळे सुरक्षा रक्षकांना त्यांच्या नोंदणीबाबत अडचण निर्माण होत होती. त्यामुळे सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी संदर्भात व मैदानी परीक्षेसाठीच्या वयोमर्यादे संदर्भात अडचणी येत असल्याने नोंदणी संदर्भातील दि.२५/८/२०१० रोजीच्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :-

१) खाजगी सुरक्षा रक्षकांनी मालकाकडे १८० दिवसाऐवजी ६० दिवस काम केल्याचा पुरावा दिल्यास संबंधीत मंडळाने अशा सुरक्षा रक्षकांची नोंदणी करावी अथवा मंडळाच्या अधिकाऱ्याचा निरीक्षण अहवाल ग्राहय धरण्यात येवून नोंदणी करावी.

२) मुळ मालकाने अशा सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी करण्यास संमती न दिल्यास मंडळाने अशा सुरक्षा रक्षकांचा अर्ज घेऊन नोंदणी करावी व त्यांच मुळ मालकाने ते सुरक्षा रक्षक ठेवण्यास मान्यता न दिल्यास खाजगी सुरक्षा रक्षकांना मंडळाच्या प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात यावे.

३) खाजगी सुरक्षा एजन्सी मार्फत विविध आस्थापनांमध्ये कार्यरत असणारे. व ज्यांचे वय ३५ वर्षापेक्षा जास्त आहे अशा सुरक्षा रक्षकांना मंडळामध्ये नोंदीत करताना शासन निर्णय क्र.एसजीए-१५२००९/प्र.क्र.१५८८/कामगार-५, दि.२/३/२००९ मधील क्र.५ अन्वये विषद केल्यानुसार मैदानी परीक्षा लागु असणार नाही. तथापि ३५ वर्षापेक्षा कमी वय असणा-या सुरक्षा रक्षकांनी उक्त शासननिर्णयानुसार मैदानी परीक्षा पात्रतेचे निकष पूर्ण करणे आवश्यक असेल.

वरील सुधारणां व्यतिरिक्त इतर सर्व तरतुदी यापूर्वी नोंदणी संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांप्रमाणेच राहतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण अधिनियम, १९८१ च्या कलम ८(४) अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सदरहू शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर २०१३१०१७१३०६१८४७१० या क्रमांकाने उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

( मा. द. थोरवे )
कार्यासन अधिकारी.

प्रत :-

१) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
३) प्रधान सचिव (कामगार ) यांचे स्वीय सहायक
४) कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) सह आयुक्त कामगार (माथाडी), महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) अध्यक्ष, सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, धुळे, सांगली, अहमदनगर, अमरावती, चंद्रपूर व कोल्हापूर.
७) संचालक, महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, दादाभाई चमारबागवाला मार्ग, परळ, मुंबई- ४०० ०१२
८) सर्व जिल्हा सहायक कामगार आयुक्त व जिल्हा कामगार अधिकारी.
९) सर्व विशेष जिल्हा समाजकल्याणअधिकारी / रोजगार व स्वयंरोजगारअधिकारी.

H:\Ragistration of security guards १८० days to ९० days.docx